पुष्प **स्वाध्याय माला** २०९ वे



# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर

मार्गशीर्ष

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9545

BVBK-0401545

वाचनालय
बा.वा.
१५८५
१५।१।८३

स्वाध्यायमाला : पुष्प २०९ वे प्रथम विभाग

## भारतीय सण व उत्सव

# मार्गशीर्ष मास

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १५८५ दि. १५।१।८३

लेखिका
सौ. कुमुदिनी रांगणेकर,
मुंबई

★

BVBK-0401545

किंमत ७५ पैसे
किंमत ५० पैसे

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटचा-छोटचा पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकाच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी भेट देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

वा. क्र. ७५७५

# मार्गशीर्ष मास

हुऽ ! आता पाचवा हेमंत ऋतू सुरू झाला बरं. अन् उन्हाळा, पावसाळा व हिवाळा ह्या तीन काळामधला शेवटला काळ सुरू झाला आहे. एकेक काळ चार-चार महिने असतो. पावसाळ्याचे चार महिने आताच सरलेत. नि हळूहळू हिवाळ्याची थंडी डोकावून पाहू लागते आहे.

रात्री दव पडण्यास ह्या हेमंत ऋतूतच सुरुवात होते. सुगीचे दिवस हे. पिकांना बहर आला आहे. शेतीची कामे संपत आली आहेत.

मार्गशीर्ष हा चांगला व पवित्र महिना मानला जातो. त्यात लग्नाचे मुहूर्तहि असतात. श्रीकृष्णाने सुद्धा सर्व महिन्यात मी मार्गशीर्ष महिना आहे असे गीतेत म्हटले आहे. कुरुक्षेत्रावर गीताही कृष्णाने अर्जुनाला मार्गशीर्ष महिन्यातच सांगितली. त्यावरून या महिन्याचे महत्त्व आपल्या ध्यानी येते.

### चंपाषष्ठी

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत काही शिवालयांतून व काही देवीच्या देवळांतून उत्सव चालतो. त्यांतील शेवटला दिवस हा मुख्य मानला आहे. ह्या षष्ठीला चंपाषष्ठी म्हणतात.

साधारणपणे षष्ठी ही तिथी देवीप्रीत्यर्थ पाळण्यात येते, पण महाराष्ट्रातील काही भागांत हा चंपाषष्ठीचा उत्सव खंडोबा-प्रीत्यर्थ होतो. जेजुरी, पाली, मंगसुळी ही खंडोबाची सुप्रसिद्ध स्थाने आहेत.

या देवतेविषयी अशी कथा सांगतात की, पूर्वी मणि व मल्ल ह्या नावाचे दोन राक्षस लोकांना फार पीडा देऊ लागले. तेव्हा शंकराने खंडोबा ह्या नावाने योद्ध्याचे रूप धारण केले आणि प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत सहा दिवस युद्ध करून त्यांना हरविले. म्हणून खंडोबाला मल्हारी असे म्हणतात. मल्लाचा अरी – शत्रू तो मल्हारी.

जेजुरीला खंडोबाचे देवालय आहे. खंडोबाला मल्लारी, मल्लारी मार्तंड किंवा बहिरोबा म्हणतात. खंडोबाच्या बायकोचे नाव म्हाळसा नि म्हणून खंडोबाला म्हाळसाकांत––म्हाळसेचा नवरा—असेहि म्हणतात. त्याच्या काही भक्तांचे कुलदैवत मल्लारी असते. तर काहींचे कुलदैवत म्हाळसा असते. मल्लारी हे कुलदैवत मराठ्यांसारख्या क्षत्रिय बाण्याच्या लोकांत विशेष पूज्य आहे.

ह्याला बनाई म्हणून आणखी एक बायको आहे असे म्हणतात. वाघ्या ह्या नावाचे खंडोबाचे सेवक असतात. ते हाताने घंटा वाजवीत खंडोबाच्या स्तुतीची गाणी गात फिरतात. त्यांत पुढील गंमतीचे गाणे असते.

या, या जेजुरी नगरात । कोन्या चन्दनी महालात ।।
म्हाळसा, बनाई भांडती । ऐकोनि मल्लारी हासती ।।
सवती-सवतीचे भांडण । राळ्या भाताचे कांडण ।।
दोघी मुसळी झुंजती । ऐकोनी मल्लारी हासती ।।

म्हाळसा व बनाई ह्या दोघी सवतींना मुसळाची उपमा दिली आहे ह्या गाण्यात.

ह्या वाघ्यांच्या कंबरेला एक चामड्याची पिशवी असते नि तीत खंडोबाचा भंडार असतो. ते अंगारा म्हणून तो देतात.

खंडोबा शंकराचा अवतार आहे असे मानतात. तेव्हा शंकराप्रमाणे त्यालाही बेल आवडतो. अन् म्हणूनच कोणतीही महत्त्वाची कामगिरी अंगावर घेताना पूर्वीच्या काळी मराठे वीर खंडोबाचा बेलभंडार उचलीत. राजपूत वीर जसा पैजेचा विडा उचलीत तसाच, जबाबदारी स्वीकारली हे दाखविण्यासाठी बेलभंडार उचलण्याची रीत होती.

## गीता-जयंती

कौरव पांडवांचे फार मोठे युद्ध झाले होते. त्याला भारतीय युद्ध म्हणतात. त्या युद्धाच्या वेळी अर्जुन एकाएकी बावरला. कौरव आपले नातलग आणि आपले कित्येक पूज्य गुरुजन त्यांच्या बाजूला. अशा स्थितीत त्यांच्यावर हत्यार कसे उचलावे अशी शंका अर्जुनाला आली आणि हातातील धनुष्य टाकून तो रथात स्तब्ध बसून राहिला.



श्रीकृष्ण अर्जुनाच्या रथाचा सारथी होता. त्या वेळी त्याने अर्जुनाला ही भगवद्गीता सांगितली आणि त्याला धीर दिला.

शरीरापेक्षा आत्म्याचे महत्व अधिक असते आणि आत्मा अमर असतो. त्याला कोणीच मारू शकत नाही. हे तत्त्वज्ञान श्रीकृष्णाने अर्जुनाला शिकविले. जय व पराजय ह्याची पर्वा बाळगणे चुकीचे आहे. आपण निव्वळ कर्तव्य करावयाचे असा उपदेश केला आणि नंतर अर्जुन लढावयाला तयार झाला.

'सर्व महिन्यांत मार्गशीर्ष मास मी आहे' असे भगवद्गीतेत श्रीकृष्णाने म्हटले असल्याचे प्रारंभी सांगितले आहेच. मार्गशीर्ष मासाचा हा मोठाच गौरव आहे आणि मार्गशीर्ष शुद्ध एकादशी ह्या दिवशी श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगितली. म्हणून ह्या एकादशीला गीता-जयंती म्हणणे योग्य होईल. भगवद्गीतेतील महत्त्वाचे श्लोक ह्या दिवशी पाठ करावे म्हणजे गीताजयंती साजरी होईल !

द्रविड देशातही ही एकादशी मोठी मानतात. कारण ह्या देशात नाम्मल्वर नावाचा एक साधू होऊन गेला. तो संत तुकारामाप्रमाणे आपल्या देहासह ह्या तिथीला वैकुंठाला गेला. त्या वेळी त्याला पहावयाला तेहतीस कोटी देव स्वर्गातून खाली उतरले होते अशी तेथील लोकांची समजूत आहे.

ह्या एकादशीला ते मुक्कोटी किंवा वैकुंठ एकादशी म्हणतात. मुक्कोटी हे मुप्पट्टी—मुक्कोटी ह्याचे संक्षिप्त रूप आहे नि त्याचा अर्थ तेहतीस कोटी देव असा होतो. नाम्मल्वर साधूचे स्वर्गारोहण पहाण्यासाठी पृथ्वीवर आलेल्या देवांच्या संख्येवरून हा शब्द ह्या महाएकादशीला जोडण्यात आला.

तामीळ देशात ही एकादशी अत्यंत पवित्र मानली जाते. कारण या दिवशी श्रीकृष्णाच्या देहातून एकादशी ह्या नावाची एक देवी उत्पन्न झाली असे तेथील लोक समजतात.

श्रीरंगपट्टण येथे पंढरपुराप्रमाणेच ह्या एकादशीच्या दहा दिवसांपूर्वीपासून सुमारे तीन आठवडे मोठी यात्रा भरते. त्या वेळी इथे हजारो लोक जमतात.

## दत्तजयंती

आता ह्यानंतर मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंती येते. ह्या दिवशी दत्तात्रेयाचा जन्म झाला. दत्तात्रेयाच्या जन्माची ही अजब कथा ऐका हं.



प्राचीन काळी अत्री ह्या नावाचे एक मोठे तपस्वी ऋषी होऊन गेले. त्यांना ब्रह्मदेवाचे मानसपुत्र—मानलेला पुत्र—समजातात. कारण ब्रह्मदेवाच्या डोळ्यातील तेजापासून त्यांचा जन्म

झाला अशी कथा आहे. अर्थात्च अत्री ऋषी फार तेजस्वी होते. त्यांच्या पत्नीचे नाव अनसूया. ही महान् पतिव्रता होती.

अनसूयेच्या पातिव्रत्याच्या रसभरित कथा नारदमुनी स्वर्गातील देवदेवतांना सांगत. त्या ऐकून एकदा सरस्वती, लक्ष्मी व पार्वती ह्या देवतांच्या मनात मत्सर उत्पन्न झाला. एवढी कोण ही महासती की जिचे कौतुक नारदमुनींनी आम्हांला ऐकवावे ? हंऽ! जाणूनबुजून ती पृथ्वीवरील एक स्त्री ! बस्स ! तिचा नक्षा उतरवायलाच हवा !

अन् तिची फजिती करण्यासाठी त्या तिघींनी ब्रह्मा, विष्णू व महेश ह्यांना पृथ्वीवर धाडले.

ब्रह्मा, विष्णू व महेश तीन पाहुणे बनले आणि अत्री ऋषी बाहेर गेलेत असे पाहून ते त्यांच्या घराकडे गेले. अनसूयेने त्यांचे



व्यवस्थित स्वागत केले. कारण अतिथीला देवासारखा मान द्यावा असे शास्त्रात सांगितले आहे.

अनसूयेने चटकन् जेवण तयार केले व पाहुण्यांना जेवावयाला बसण्याची विनंती केली. पाहुणे चुळबुळू लागले. अनसूयेची परीक्षा पहावयाला ना आले होते ते ? अन् मग हळूच त्यांनी आपले खरे दात दाखविले. आपली एक अट पुरी झाली तर आपण जेऊ असे सांगितले त्यांनी. अर्थात्च अनसूयेने अट पुरी करण्याचे कबूल केले. मग काय करणार ? रागाने पाहुणे—अतिथी—न जेवता निघून गेले तर ? केवढे पाप लागेल ना ?

पाहुण्यांनी एक मोठी विचित्र अट घातली. काय तर म्हणे अंगावर वस्त्र न ठेविता अनसूयेने त्यांना वाढावे.

ही अट ऐकून अनसूया स्तंभित झाली. ही का अट ? भयंकरच पेच म्हणावयाचा हा ! आपल्या पातिव्रत्याची मोठीच कसोटी आहे ही !—पण हार खावयाची नाही. माघार घ्यावयाची नाही !

क्षणभर तिने स्वतःशी विचार केला आणि आपल्या अंगातील सामर्थ्याने त्या तीन पाहुण्यांना तान्ही बाळे बनविली.

केवढे अजब सामर्थ्य हे त्या सतीचे ! तिची फजिती करण्यासाठी आलेल्या त्या तीन महान् देवांचे क्षणात असहाय्य अर्भकांत रूपांतर झाले. क्यांहा क्यांहा करीत रडू लागली ती बाळे. अनसूयेने त्यांना पाळण्यात घातले नि प्रेमाने ती त्यांना आंदळू लागली.

इकडे स्वर्गात मोठी धांदल उडाली. त्या तीन देवांच्या बायका–सरस्वती, लक्ष्मी व पार्वती–कासावीस झाल्या. एवढे मोठे देव जर बाळे झाले तर सृष्टीची जबाबदारी कोण घेणार ?

ब्रह्मा, विष्णू व महेश आता मनात उमजले होते. त्यांनी अनसूयेची क्षमा मागितली. तीन बाळांच्या रूपाने आपले अंश त्या सतीच्या घरी ठेवले नि ते स्वर्गात निघून गेले.

अनसूयेने त्या तीन बालकांची नावे सोम, दत्त व दुर्वास अशी ठेवली. पुढे बाळे मोठी झाल्यावर सोम चंद्रलोकी निघून गेला आणि दुर्वास तप करण्यासाठी अरण्यात गेला. मात्र निघून जाताना त्यांनी आपापले अंश दत्ताच्या ठिकाणी ठेवले. त्यामुळे दत्ताच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू आणि महेश ह्या तिघांचा संयोग घडून आला.

आत्रेय म्हणजे अत्रीचा. दत्त हा अनसूयेचा मानसपुत्र होता म्हणून त्याला अत्रीचाही मानसपुत्र म्हणत नि त्याचमुळे त्याचे दत्तात्रेय असे नाव पडले.

दत्तात्रेयाने बाळपणीच वेद शिकून घेतले. नंतर वेद शिकविण्यास त्याने प्रारंभ केला. पुढे अनसूयेने त्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा आग्रह केला; पण दत्तात्रेयाला आपला ब्रह्मचर्याश्रमच पसंत होता. त्याने अनसूयेला ब्रह्मविद्येचा उपदेश केला आणि घरातून निघून जाण्याची परवानगी तिच्याकडून मिळविली.

दत्तात्रेयाने अनसूयेला केलेला उपदेश फार महत्त्वाचा आहे. त्यांत ब्रह्मज्ञानाची चर्चा केली आहे. ती फार गहन–कठिण–आहे. पण निसर्गाला गुरू करून त्याच्यापासून आपण, सर्वांशी समदृष्टीने वागणे व शिस्तीने कर्तव्य पार पाडणे इ. गुण घेतले पाहिजेत, हा त्यांनी केलेला उपदेशही महत्त्वाचा आहे.

दत्तात्रेयाचा अवतार फार महत्त्वाचा आहे. हरिहरांत भेद मानणारे वैष्णव व शैव दत्तात्रेयाला पूज्य दैवत मानतात नि त्या वेळी त्यांच्या हृदयांतील तो भेद आपोआपच नष्ट होतो. एकदा दत्तात्रेयाला हात जोडले की, शैववैष्णवांची एकी झालीच ! त्यानंतर त्यांनी रुद्राक्षमाळा नि तुलसीमाळा ह्यांत फरक मानण्यात काही अर्थ नाही ! त्यांचा मतभेद संपला. नंतर तो हट्टाने पुनः उकरून काढला तरी त्याला किंमत नाही !

तेव्हा ह्या हटवादी शैववैष्णवांची नकळत समजूत पाडण्याचे नि समेट करण्याचे मोठेच काम दत्तात्रेयाने केले आहे.

दत्तजयंतीच्या दिवशी गुरुचरित्राच्या पोथीचे पारायण करितात. महाराष्ट्रात गाणगापूर, नरसोबाची वाडी व मिरजे-जवळचे औदुंबर हे खेडे ही दत्ताची स्थाने आहेत.

## जोगा परमानंद पुण्यतिथी

ह्यानंतर मार्गशीर्ष वद्य चतुर्थीला एका संताची पुण्यतिथी येते. त्याचे नाव जोगा परमानंद. त्याचे स्वतःचे नाव जोगा व त्याच्या गुरूचे नाव परमानंद.

हा पंढरपुराजवळील बार्शी गावी राहत असे. तो जातीने शूद्र होता. अन् तरीही तो संतपदाला पोचला ! ही गोष्ट फारच कौतुकास्पद आहे. ब्राह्मण जातीतील माणूस संत होणे एक वेळ सोपे आहे. कारण त्याच्या घरातील व भोवतीचे वातावरण त्याला अनुकूल असेच असते. बाळपणापासून त्याच्यावर चांगले संस्कार होतात. त्याला शिक्षण मिळू लागते.

पण शूद्राची गोष्ट अगदी वेगळी असते. सर्वच गोष्टी त्याच्या विरुद्ध असतात. त्याने वेदासारखा पवित्र ग्रंथ शिकण्याचीही चोरी असते. परंतु जे खरे थोर असतात ते परिस्थिती मनासारखी बनवितात नि आपले संकल्प सिद्धीस नेतात.

जोगा परमानंद हा असा थोर होता. जन्माने तो थोर नव्हता; पण कर्माने थोर झाला !

महीपती नावाचा एक ब्राह्मण कवी होऊन गेला. त्याने भक्तिविजय हा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने ह्या जोगा परमानंदा-बद्दल माहिती दिली आहे.

रोज पहाटे जोगा स्नान करीत असत नि भगवद्गीतेचा एक श्लोक म्हणून प्रत्येक श्लोकागणिक एक नमस्कार ह्याप्रमाणे सातशे नमस्कार ते रोज घालीत. त्यांचा नेमच होता तो.

हं ऽ ! एकदा काय झाले, जोगा पंढरपुराला गेले होते. नि पुष्कळ पाऊस पडल्यामुळे सर्वत्र चिखल झाला होता आणि त्या चिखलातच जोगा परमानंद आपल्या नित्यनेमाप्रमाणे देवाला नमस्कार घालीत होते. देऊळाच्या महाद्वारात काही व्यापारी उतरले होते. जोगाचे धोतर चिखलाने भरलेले पाहून त्यांना दया आली. आणि एका व्यापाऱ्याने एक भारी किंमतीचा पीतांबर त्यांना दिला. तेव्हा जोगा म्हणाले, "मला गरिबाला हा पीतांबर कशाला ? यापेक्षा एखादे जुने धोतरच द्या मला." पण व्यापाऱ्याने फार आग्रह केला. इतकेच नव्हे तर जोगा परमानंदांना तो पीतांबर स्वत: नेसविला.

पीतांबर नेसल्यावर जोगा पुनः नमस्कार घालू लागले. परंतु ते उंची वस्त्र चिखलात भरेल, ह्या शंकेने त्यांनी ओचे खोवले.



आणि ते फार जपून नमस्कार घालू लागले. त्यामुळे अर्थातच नमस्कार नीटसे घातले जाईनात. दुपारचे बारा वाजले तरी सातशे नमस्कारांची संख्या पुरी होईना. तेव्हा ह्या पीतांबरापायी आपल्या नित्यनेमात अडथळा येतो आहे, हे त्यांच्या लक्षात आले. आणि पीतांबराच्या मोहाने असा कर्तव्यात अंगचुकारपणा करणाऱ्या आपल्या देहाचा त्यांना राग आला. त्यांनी देहाला कडक शिक्षा करण्याचे ठरविले.

महाद्वारासमोरून एक शेतकरी दोन बैल घेऊन रस्त्याने चालला होता. त्याला हाक मारून ते म्हणाले, "अरे, हा भारी पीतांबर मी तुला देतो. त्याच्या बदल्यात तुझे हे बैल तू मला दे."

शेतकऱ्याने ते कबूल केले. मग जोगांनी त्याला म्हटले, “ आता तू एक काम कर. बैलांच्या मानेवर ते जू ठेव. जुवाला माझे पाय दोराने बांधून टाक आणि बैलांच्या पाठीवर चाबकाचा एकेक फटकारा लगाव नि तू घरी जा. ”

शेतकरी अगदीच अडाणी होता. परिणामाचा विचार न करिता त्याने त्याप्रमाणे केले. नि बैलांना एकेक चाबकाचा फटकारा लगावून तो चालता झाला.

चाबकाचा तडाका पाठीवर बसताच बैल उधळले आणि रानोमाळ पळत सुटले. रानावनातून काटयाकुटयांतून वाट फुटेल तिथे ते पळत होते नि बरोबर जोगाही फरफटत चालले होते. त्यांना भयंकर इजा झाली. अंगाची कातडी सोलून निघाली नि रक्ताची धार वाहू लागली. पण त्यांनी तोंडावाटे ब्र काढला नाही. आपल्या अपराधाला हे योग्यच शासन आहे असे वाटले त्यांना. महीपतीने ह्याचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे.

ऐसे समाधान मनी मानून । मुखी करीत नामस्मरण ।।
जयरुक्मिणीमानसरंजना । पयोब्धिवासा शेषशयना ।।
ऐशा रीती स्मरण करित । कंठ झाला सद्‌गदित ।।
वृषभ पळती अरण्यात । त्यामागे ओढत जातसे ।।

शेवटी त्या रुक्मिणीकांतालाच ह्या भक्ताची दया आली. भगवंत धावत आले नि त्यांनी दोर तोडून बैलांना सोडविले आणि जोगाला आलिंगन दिले. पंढरीनाथाची अमृतदृष्टी जोगाच्या देहावर पडताच त्यांचा देह पूर्वीसारखा बनला.

असे होते जोगा परमानंद. आपल्या देहाचासुद्धा त्यांना लोभ नव्हता. त्यांनी पुष्कळ कविता केल्या. नामदेवाचे गुरू विसोबा खेचर हे त्या कविता उतरून घेत अशी दंतकथा आहे.

जोगा परमानंदाची समाधी बार्शी येथे आहे. माघ वद्य चतुर्थीला त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त तिथे उत्सव होतो.

**मोरया गोसावी पुण्यतिथी**

त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे मार्गशीर्ष वद्य षष्ठीला आणखी एका भक्ताची पुण्यतिथी साजरी होते. त्याचे नाव मोरया गोसावी.

कर्नाटकातील शाली नावाच्या गावात वामनभट्ट नावाचा एक ब्राह्मण रहात असे. शाली गावाचे रहिवासी म्हणून त्यांचे शालिग्राम असे आडनाव पडले. पण पुढे ह्या घराण्यात अनेक सत्पुरुष निपजले. त्यामुळे देव ह्या आडनावाने हे घराणे ओळखले जाऊ लागले.

वामनभट्ट गणपतीचे उपासक होते. ते पन्नास वर्षांचे झाले तरी त्यांना मुलगा झाला नाही. जुन्या लोकांना मुलाची फार अपूर्वाई वाटत असे. मुलाला संस्कृतात पुत्र म्हणतात. पुत्र म्हणजे 'पुं नाम नरकात् त्रायते इति' असा अर्थ करण्यात येतो. पुं नावाच्या नरकापासून जो वाचवितो तो पुत्र. ज्याला पुत्र नाही त्याला मेल्यानंतर पुं नावाच्या नरकात पडावे लागते, अशी त्या काळी कल्पना होती. आता इंग्रजी शिक्षण सुरू झाले, समाज सुधारला, त्यामुळे अशा कल्पनाही मागे पडल्या. परंतु एवढे मात्र खरे की, आपले नाव मुलगा पुढे चालवितो. ह्यासाठी प्रत्येकाला

मुलगा हवासा वाटत असतो आजकालसुद्धा. मुली लग्ने होऊन दुसऱ्याच्या घरी जातात. ‘ दारीच्या चिमण्या उडुनी जाती ’ असे मुलीचे वर्णन केले जाते. तेच मुलगा व त्याची बायकोमुले आपल्याजवळ रहातात.


प्रत्येक मुलाने हे लक्षात ठेवावयाला हवे की, मुलांवर वेगळी जबाबदारी असते. आईवडिलांच्या आशा त्याच्यावर केंद्रित झालेल्या असतात. वडिलांना त्यांच्या मृत्यूनंतर मुलगा पुं नरकापासून वाचवितो की नाही, ते काही कोणी सांगू शकणार नाही; पण वडिलांच्या हयातीत त्यांच्याशी मुलगा फटकून वागला तर त्यांच्या मनाला खात्रीने नरकयातना होतील ! तेव्हा मुलाने जर आईवडिलांशी शेवटपर्यंत प्रेमाचे वर्तन केले तर पुत्र ह्या नावाचे सार्थक होईल !

नंतर वामनभट्ट मोरगावी गेले---नि तेथे त्यांनी तपश्चर्या केली. गणेशाच्या कृपेने त्यांना पुत्र झाला. तेच मोरया गोसावी.

मोरया गोसावी यांची आठव्या वर्षी मुंज झाली. नंतर ह्यांनी सर्व वेद शिकून घेतले. योगीराज नावाच्या सत्पुरुषाचा उपदेश घेतला. नि मग थेऊर येथे घोर तपश्चर्या केली. त्यामुळे श्रीगणेश त्यांच्यावर प्रसन्न झाला.

त्यानंतर ते चिंचवड मुक्कामी राहू लागले. पुढे त्यांचा विवाह झाला नि त्यांना मुलगा झाला. प्रारंभी दर चतुर्थीला ते मोरगावची वारी करीत. चतुर्थी ही गणपतीची तिथी आहे. नवल असे की, मोरया गोसावी ह्यांचा जन्मही चतुर्थीला झाला आणि त्यांचा मुलगाही चतुर्थीलाच जन्मला.

पुढे मोरया गोसावी ह्यांना देवाचा साक्षात्कार झाला मोरगावी ते नदीत आंघोळ करीत असता त्यांच्या हातात एक गणपतीची मूर्ती आली. तेव्हा त्यांनी नदीच्या काठीच तिची पूजा केली आणि तिला सर्व शाकभाजी व पोळी यांचा नैवेद्य दाखविला. ज्या जागेवर हे केले ती जागा अजून तेथे 'पोळी' ह्या नावाने प्रसिद्ध आहे. तेथे त्या दिवसापासून आजपर्यंत सर्वांना प्रसाद वाटण्यात येतो. नंतर मोरया गोसावींनी ती मूर्ती चिंचवड येथे नेऊन ठेवली. आजही ती वाड्यात पहावयास मिळते.



पुढे मोरया गोसावी यांची कीर्ती फार वाढली. पण नंतर त्यांना लोकांपासून दूर रहाण्याची इच्छा झाली. म्हणून त्यांनी मार्गशीर्ष वद्य षष्ठीला जिवंत समाधी घेतली. त्या वेळी त्यांचे वय १८६ वर्षांचे होते असे म्हणतात. त्यांची पुण्यतिथी चिंचवडला मोठ्या समारंभाने साजरी होते.

एकंदरीत वामनभटांना पुत्र हवासा वाटत होता. तो हवा तसाही निपजला. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा त्रिभुवनी झेंडा ।' असे म्हणतात. मोरया गोसावी ह्यांनी खरोखरीच आपल्या कीर्तीचा झेंडा फडकविला.

**ताराबाई पुण्यतिथी**

या मार्गशीर्ष मासातच ताराबाई भोसले हिची पुण्यतिथी येते. भोसले घराण्यात हिच्याएवढी पराक्रमी स्त्री दुसरी असेल असे वाटत नाही ! परंतु वडील दीराचा मुलगा शाहू राज्याचा वारस आहे, हे तिने मान्य केले नाही नि त्यामुळे मराठी राज्याचे विलक्षण नुकसान झाले.

राजाराम महाराज वारल्यावर हिने केवढ्या तडफेने



औरंगजेबाला तोंड दिले होते. पण शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेली गादी रिकामी पडताच हिचा स्वार्थ डोकावू लागला. खरा वारस शाहू, मोगलांच्या कैदेत. तेव्हा तिने आपल्या मुलाला

गादीवर बसविले. ह्याचे नाव तिने शिवाजी असे ठेवले होते. राजाराम महाराज वारले तेव्हा हा शिवाजी दहा वर्षांचा होता.

मराठेशाहीची गादी रिकामी राहिली तर अंदाधुंदी होईल. गादीवर तात्पुरता राजा हवा, ह्या शुद्ध हेतूने तिने आपल्या मुलाला गादीवर बसविला असता तर ते ठीक होते. "पण आपण परत येतो आहे, कैदेतून सुटलो आहे," हे शाहूने तिला कळविले तरीही ती हातातली सत्ता सोडीना.

एवढेच नव्हे तर शाहू हा छत्रपती संभाजीचा मुलगा नाहीच. तो कोणीतरी तोतया आहे असेच ती म्हणू लागली.

हाच फुटीरपणा नडला ! हाच एकीचा अभाव घातक ठरला ! ताराबाईने त्यापूर्वी सतरा वर्षे आपल्या बाजूला असलेल्या शूर लोकांकडून स्वामीभक्तीच्या शपथा घेवविल्या व शाहूला तोंड देण्याचे ठरविले.

धनाजी जाधव, खंडो बल्लाळ व परशुराम त्रिंबक ह्यांची ह्या स्वारीवर ताराबाईने रवानगी केली. पण शाहूने खंडो बल्लाळ व धनाजी जाधव ह्या दोघांना आपणाकडे वळवून घेतले. आणि पुण्याच्या उत्तरेस बावीस मैलांवर खेड-कडूस येथे दोन्ही पक्षांची चकमक झडली. त्यात ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला आणि परशुराम त्रिंबक साताऱ्यास परत गेला.

पुढे धनाजीच्या मदतीने शाहूने २।३ किल्ले घेतले. साताऱ्यास जाऊन स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. तेव्हा ताराबाई साताऱ्याहून पन्हाळ्याला पळून गेली.

नंतर शाहूने पन्हाळगड किल्लाही घेतला. म्हणून ताराबाई मालवणास पळून गेली. आता ताराबाईचा पक्ष अगदीच मंदावला;

पण तेवढ्यात पन्हाळ्याच्या किल्लेदाराने तो किल्ला हिच्या स्वाधीन केला. हिने मग वाडीकर सावंताच्या मदतीने आणखी काही किल्ले घेतले.

ताराबाईने पन्हाळा व कोल्हापूर ही दोन रहाण्याची ठिकाणे कायम केली. तिच्या पक्षाला पुन: जोर चढला. त्यातच धनाजी मारला गेला. त्याचा मुलगा ताराबाईच्या पक्षाला येऊन मिळाला. इतर जुनी मंडळी हिच्या बाजूला होतीच

पण पुन: हिचा पडता काळ आला. शाहूने सैन्य जमविले व हिच्याशी सामना केला. आणि हिच्या सरदारांना आपणाकडे वळविले.

ताराबाईचा मुलगा शिवाजी हा जरा वेडसर होता. त्याला अगदी वेडा ठरविले. त्यामुळे शाहूचा पक्ष बळकट झाला. तेवढ्यात ताराबाईचा मुलगा मरण पावला. तेव्हा कोल्हापुरातील सरदारांनी ताराबाईच्या सवतीच्या मुलाला—संभाजीला—गादीवर बसविले.

कालान्तराने शाहू दत्तक घेणार आहे असे तिने ऐकले. आपल्या मुलाचा मुलगा राजाराम ह्यालाच दत्तक घ्या, असा तिने शाहूला आग्रह केला. शाहूने ते कबूल केले व त्यानंतर शाहू वारला.

पुढे राजाराम गादीवर बसला. पण राज्यकारभार आपल्या हाती येईल ही ताराबाईची आशा खोटी ठरली. त्यामुळे ती चिडली आणि राजाराम हा आपला नातूच नव्हे असे सांगू लागली.

आणि नंतर ती भलती कारस्थाने करू लागली. तिने राजारामाला कैद केले. ताराबाईच्या मरणापर्यंत तो तिच्या कैदेतच होता. ताराबाई वारली तेव्हा तिचे वय ८६ वर्षांचे होते

शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेले राज्य टिकविण्यासाठीच जर ही झटली असती तर इतिहासच बदलला असता ! शाहूने व तिने सर्व सरदारांच्या मदतीने मराठेशाहीचे बूड चांगलेच घट्ट केले असते ! कारण ताराबाई पराक्रमी होती, मुत्सद्दी होती ! राजकारणी पुरुषांच्या अंगी असणारे सर्व गुण तिच्या अंगात होते. पण त्यांचा उपयोग झाला नाही.

ताराबाईच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने ह्या महिन्यात तिचे चरित्र अवश्य वाचावे. थोर माणसांची चरित्रे वहुधा अनुकरण करण्याच्या लायकीची असतातच. परंतु काही झाले तरी माणसेच होती ना ती ? त्यामुळे त्यांनी चांगल्या गोष्टी तर केल्याच; पण त्यांच्या हातून काही वाईट गोष्टीही घडलेल्या असतात. तेव्हा आंधळेपणाने त्यांचे अनुकरण करावयाचे नाही.

हंसक्षीर न्यायाने त्यांच्या चरित्राचा अभ्यास करावा. हंसक्षीरन्याय ठाऊक आहे का तुम्हांला ? हंस पक्षी मोठा चतुर असतो म्हणे ! दुधात पाणी मिसळून त्याच्या पुढे ठेविले तर तो चोचीने त्यातील फक्त दूध तेवढेच ओढून पितो आणि निव्वळ पाणी भांड्यात ठेवतो !

ह्या पद्धतीनेच आपण थोरांची चरित्रे वाचावयास हवीत ! थोरांच्या चरित्रातील त्यांनी केलेली उत्तम कृत्ये म्हणजे दूध आणि वाईट कृत्ये म्हणजे पाणी ! हंसक्षीर न्यायाने आपण उत्तम कृत्याचे दूधच उचलावयाचे. एक पक्षी जे करू शकतो ते आपण माणसे खात्रीनेच करू शकू ! खरे ना ?

**सरदार वल्लभभाई पटेल पुण्यतिथी**


सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचा ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजराथमधील एका गावी जन्म झाला. आणि १५ डिसेंबर १९५० रोजीं ते मरण पावले. डिसेंबर महिना सामान्यपणे

मार्गशीर्षात येतो. म्हणून या महिन्यात त्यांची पुण्यतिथी साजरी करू या.

मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी वकिलीची परीक्षा दिली व पुढे ते विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन आले. ते कमालीचे धीट व निर्भय होते.

विलायतेत असताना त्यांचा पाय दुखावला. त्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या; पण त्या अयशस्वी झाल्या. तेव्हा एक डॉक्टर म्हणाले की, गुंगीचे औषध न घेता शस्त्रक्रिया केली तर पाय बरा होण्याचा अधिक संभव आहे ! त्या वेळी वल्लभभाईंनी अगदी धैर्याने सार्‍या वेदना सहन केल्या व त्यांचा पाय बरा झाला.

पुढे महात्मा गांधींची व त्यांची ओळख झाली. गांधीजींप्रमाणे तेही देशाच्या सेवेसाठी बॅरिस्टरी सोडून पुढे आले. देशसेवा करतानाही त्यांचा हा निघडेपणाचा गुण पावलोपावली प्रकट झाला. ह्या त्यांच्या गुणामुळेच त्यांना 'पोलादी पुरुष' म्हणत. त्यांचे मन पोलादासारख कणखर होते. म्हणजे ते निष्ठुर नव्हते; तर एखादी गोष्ट चांगली आहे, देशाच्या हिताची आहे, असे पटले की, ते धडाडीने पुढे होऊन ती करून टाकीत.



सरदार वल्लभभाई पटेल

गुजराथमधील वारडोली गावातल्या शेतकऱ्यांना

१९२८ साली इंग्रज सरकारने फार छळले. जमीन-महसूल एकदम पुष्कळ वाढविला. तेव्हा ते शेतकरी वल्लभभाईंकडे आले. कारण वल्लभभाईही शेतकरी घराण्यातलेच होते. वल्लभभाई म्हणाले की, "तुम्ही सारे बारडोलीला परत जा. जमिनीचा सारा इंग्रज सरकारला मुळीच देऊ नका. तुम्ही सर्व शेतकरी एकजुटीने हे करण्यास तयार असला तर मी तिथे येऊन तुम्हांला मदत करायला तयार आहे."

सर्व शेतकरी वल्लभभाईंच्या सांगण्याप्रमाणे वागले आणि त्यांनी इंग्रज सरकारला हार खायला लावली. इतिहासात ी चळवळ बारडोलीचा सत्याग्रह किंवा बारडोलीचा लढा ह्या नावाने प्रसिद्ध आहे.

शेतकऱ्यांची एवढी एकी घडवून चळवळ यशस्वी केल्या-बद्दल महात्मा गांधींनी वल्लभभाईंना 'बारडोलीचा सरदार' असा किताब दिला. तेव्हापासून ते सरदार पटेल ह्या नावाने ओळखले जातात !

सरदार वल्लभभाईंना गांधीजींचा उजवा हात म्हटले जाई ! त्यांनी गांधीजींच्या बरोबरीने असहकारितेच्या व कायदे-भंगाच्या चळवळीत भाग घेतला होता. ह्या पायी ते तीनदा तुरुंगात जाऊन आले होते. १९३१ साली काँग्रेसचे अधिवेशन कराचीला भरले होते. वल्लभभाई त्याचे अध्यक्ष होते.

१५ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाल्यावर ते भारताचे उप-पंतप्रधान व गृहमंत्री बनले. हिन्दी संस्थानांसंबंधीचे खातेही त्यांच्याकडे होते. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी हिन्दी संस्था-नांनाही ब्रिटिशांनी सार्वभौमत्वाचे अधिकार दिले होते. संस्थाने सार्वभौम राहणे म्हणजे भारताच्या एकराष्ट्रीयत्वाला--एकीला--

धोका होता. अशा वेळी त्या संस्थानांना भारताच्या छत्राखाली आणून त्यांना भारतात विलीन करणे हे अतिशय बिकट काम वल्लभभाईंनी पार पाडले. व तेही कोणत्या वेळी तर भारत स्वतंत्र झाल्याबरोबरच्या अडचणीच्या काळात. वल्लभभाईंच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल भारत त्यांचा सदैव ऋणी राहील.

वल्लभभाईंनी आयुष्यभर संकटांना तोंड दिले. म्हातारपणीही त्यांचे मन कणखर होते. परंतु शरीर थकू लागले.

पुढे १९५० च्या डिसेंबर महिन्यात १५ तारखेला मुंबई येथे त्यांचे देहावसान झाले.

वल्लभभाई भारताच्या इतिहासात आपले नाव अमर करून गेले आहेत. भारताच्या एकछत्राखाली सर्व संस्थाने आणून भारत एकराज्य केल्याबद्दल देश त्यांचा नेहमी ऋणी राहील.

भारतमातेच्या अशा थोर सुपुत्राचे व पोलादी पुरुषाचे त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्मरण करून त्यांच्यापासून साहस, निर्भयता, दृढनिश्चय, कणखरपणा इत्यादी गुण घेऊन देशाची सेवा करण्याची स्फूर्ती त्यांच्या चरित्रापासून घेतली म्हणजे त्यांची पुण्यतिथी आपण खऱ्या अर्थाने साजरी केली असे होईल.

**महात्मा फुले-पुण्यतिथी**

महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले ह्यांचा जन्म फुलमाळी जातीत झाला. त्या वेळच्या मानाने त्यांना शिक्षण अगदीच थोडे मिळाले होते. पण त्यांची धडाडी दांडगी आणि चिकाटी जबर. त्या काळी समाजात ब्राह्मणांचे प्रस्थ फार माजले होते. ह्या प्रस्थाचा पद्धतशीर प्रतिकार करणारे फुले हे पहिले समाजसुधारक. लग्नकार्यात किंवा धर्मशास्त्राचा अर्थ सांगण्यासाठी

ब्राह्मणांची मुळीच गरज नाही असा आग्रह त्यांनी धरला होता. लोकांना त्यांचे हे मत कसे आवडणार? पण रूढ कल्पनांच्या चाकोरीबाहेर जाण्यासाठी फुले खूप झगडले. त्याचमुळे समाजात ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशी फूट पडली.

फुले यांनी स्त्रियांसाठी आणि अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. वडिलांच्या रागाला न जुमानता त्यांनी आपल्या पत्नीला थोडे-फार शिक्षण दिले आणि स्त्रियांना शाळेत शिकविण्यासाठी तिला तयार केले.

हीन, दुबळे व दीन लोकांबद्दल फार तळमळ वाटे त्यांना. पण त्याकाळी लोकांनी त्यांच्या त्या कळकळीचे चीज केले नाही. उलट निबंधमालाकार चिपळूणकरांसारख्या विद्वान पुढाऱ्यांनी फुल्यांवर अकारण आणि कुत्सित टीका खूप केली. अलीकडे मात्र ज्योतिबांच्या कार्याची किंमत जनतेला पटू लागली आहे. पुण्यातील भाजीचे "रे मार्केट" व मुंबईतील "क्रॉफर्ड मार्केट" ही नावे बदलून त्यांना "फुले मार्केट" असे नाव दिले आहे. हल्ली महात्मा फुले असा ज्योतिबांचा उल्लेख करण्यात येतो.

शंभर वर्षांपूर्वी आपल्या समाजाला कशाची गरज आहे हे फुल्यांनी ओळखले आणि त्या दृष्टीने आपल्याला जमेल ती समाजसेवा केली. भविष्यकाळातली गरज ओळखणाऱ्या अशा व्यक्तींना "द्रष्टा" म्हणतात. म्हणजे महात्मा फुले द्रष्टे होते असे म्हणावयाला हरकत नाही.

त्यांचा जन्म १८२७ साली झाला आणि १८९० साली ते वारले. मार्गशीर्ष महिन्यात त्यांची पुण्यतिथी येते.

फुल्यांनी काही पुस्तकेही लिहिली. पण त्यांच्या लिखाणात आणि भाषणात त्यांचा ब्राह्मणांवरील राग उफाळून येई. इंग्रजांनी

लिहिलेली पुस्तके फुल्यांनी वाचली होती. त्याचा हा परिणाम. जाती, जातीत फूट पाडावी म्हणून इंग्रजांनी मुद्दाम त्या पुस्तकात ब्राह्मणांची खरी, खोटी वैगुण्ये दाखविली होती. फुल्यांना हे कळले नाही. तरीसुद्धा त्यांच्या समाजकार्याबद्दल, कळकळीबद्दल त्यांच्या स्मृतीला मान द्यावयास हवा.

**स्वामी श्रद्धानंद-पुण्यतिथी**

ह्याच मार्गशीर्ष महिन्यात स्वामी श्रद्धानंद ह्यांची पुण्यतिथी येते.

स्वामी श्रद्धानंद हे हरिद्वार येथील गुरुकुल ह्या विश्वविद्यालयाचे संस्थापक होते.

ब्रिटिशांच्या अमदानीत अनेक अत्याचार झाले. त्यांनी कित्येक कडवट कायदे अमलात आणले. रौलट कायदा हा असाच कडवट कायदा होता. त्यामुळे दिल्लीला ह्या कायद्याविरुद्ध चळवळ केली जनतेने. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जनतेवर गोळिबार करण्याचा हुकूम दिला. पोलीसांनी गोळिबार सुरू केला.

तसे स्वामी श्रद्धानंद पुढे सरसावले. आणि त्यांनी निधड्या छातीने ह्या अत्याचाराला आव्हान दिले. खणखणीत आवाजात ते बोलले, " मी श्रद्धानंद आहे. चालव गोळी." आणि गोळी चालविणारा लाजला. त्याचा हात जणू लटका पडला. श्रद्धानंदजींच्या धैर्याचा केवढा हा प्रभाव !

हिंदुधर्माची उन्नती करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य झिजवले. दक्षिणेकडील मलबार प्रांतात हिंदूंना बाटविण्याचा प्रयत्न झाला होता. पण स्वामीजींनी तो प्रयत्न उलथून पाडला. हिंदू धर्माबद्दल त्यांना वाटणारी ओढ नुसती बोलकी नव्हती "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे." ही संत रामदासांची शिकवण स्वामी-

जींनी खरी करून दाखवली. मलबारमध्ये हिंदू धर्मावर ख्रिस्ती धर्माचे होणारे आक्रमण त्यांनी थांबविले. त्याबद्दल ख्रिस्ती धर्माचा, ख्रिस्ती लोकांचा त्यांच्यावर राग झाला असता तर ते सकारण ठरले असते. परंतु दिल्ली येथे स्वामीजी आजारी असताना काहीही कारण नसताना एका माथेफिरू मुसलमानाने त्यांचा २३ डिसेंबर १९२६ रोजी खून केला. आणि एक प्रामाणिक पाठीराखा प्राणाला मुकल्यामुळे हिंदू धर्माचे अपरिमित नुकसान झाले.

**पंडित मदनमोहन मालवीय जयंती**

ह्याच महिन्यात मदनमोहन मालवीय ह्यांचा जन्म १८६१ साली झाला. पंडितजींना हिंदू धर्माचा विलक्षण अभिमान होता.

मालवीयजी म्हणजे हिंदुत्वाचा मूर्तिमंत आदर्श असे त्यांच्याबद्दल म्हटले जाई. देवघरात नंदादीप जळत असला म्हणजे मनाला प्रसन्न वाटते. मालवीयजींच्या संगतीत असेच प्रसन्न वाटत असे. सौम्य व्यक्तिमत्व, प्रसन्न चर्या, पांढरा शुभ्र पोषाख, त्यामुळे पावित्र्याचा पुतळा वाटत ते. कपाळाला चंदनाचे गंध लावण्याचा त्यांचा रिवाज होता. आणि ते रोज नियमाने तुलसीदासांचे रामायण वाचीत असत.

एवढे धार्मिक आणि सोवळे होते पंडितजी. मग राजकारणातले पुढारी ह्या नात्याने गोलमेज परिषदेसाठी विलायतेस गेल्यावेळी त्यांनी काय केले असेल ? त्यांनी आपला ब्राह्मण स्वयंपाकी बरोबर नेला होता. त्यांना कुठे भोजनसमारंभाला बोलावीत असत तिथे पण त्यांचा स्वयंपाकी त्या घरी भोजन बनवी; आणि मग हे कट्टे हिंदू पाहुणे भोजन करीत.

मात्र हिंदू धर्माबद्दलची त्यांची ही निष्ठा एवढीच त्यांची करामत नव्हती. पंडित मालवीयांनी बनारस येथे हिंदू विश्व-

विद्यालय स्थापन केले. मोठ्या नावारूपाला आलेली संस्था आहे ती. मालवीयजी गेले. पण ह्या विश्वविद्यालयाच्या रूपाने त्यांची कीर्ती मागे उरली आहे. "मरावे परी कीर्तीरूपे उरावे" ही उक्ती त्यांच्या बाबतीत खरी ठरली आहे.

पंडित मदनमोहन मालवीय वारले. आणि शेवटचा अस्सल हिंदू पुढारी हरपला.

**या मार्गशीर्ष महिन्यात** सण फारसे नाहीतच. लग्नकार्यांची मात्र धांदल आहे. चंपाषष्ठीचा उत्सव आहे. दत्त-जयन्तीचा उपास आहे. गीताजयन्तीमुळे भगवद्गीतेची माहिती मिळविण्याची उत्तम संधी मिळते आहे. मोरया गोसावी आणि जोगा परमानंद ह्या संतांची चरित्रे वाचून मन थक्क होते ! आदराने भरून जाते ! तसेच ताराबाईसारख्या व्यक्तींची पुण्यतिथी साजरी केल्यामुळे आपल्या इतिहासाचा अभ्यास होतो ! पूर्वजांच्या मोठेपणाची बढाई मारीत राहणे चुकीचे आहे ! त्या पूर्वजांचे आपण वंशज आहोत ना ? मग हे लक्षात ठेवून आपणही काही तरी पराक्रम करावयाला हवा !

## स्वाध्याय

(१) कुरुक्षेत्रावर अर्जुनाला श्रीकृष्णाने उपदेश का केला ? त्या उपदेशाचे नाव काय ?

(२) ब्रह्मा, विष्णू, महेश अनसूयेचे सत्त्व पहाण्यासाठी पृथ्वीवर का आले ?

(३) नमस्कार पूर्ण झाले नाहीत म्हणून जोगा परमानंदांनी स्वतःला कोणती शिक्षा करून घेतली ?

(४) मोरया गोसावी यांना गणपतीचा साक्षात्कार कसा झाला ?

(५) सरदार पटेलांनी देशसेवा करताना केलेल्या दोन महत्त्वाच्या कामगिऱ्या सांगा !